# “ दलित चळवळीचे प्रेरणास्त्रोत आंबेडकरवाद आणि संविधाने ”

डॉ. संजय गायकवाड
विभाग प्रमुख मा.ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय,
मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर.



**प्रस्तावना :**

१) भारतीय वर्णभेद करणा-या जातीयतेची मांडणी हिंदू समाजातील सामाजिक व्यवस्था निर्माण करणारी विलक्षण अशी संज्ञा आहे. तिची मांडणी काही विशिष्ट तत्वाच्या आणि विषयाच्या आधारे केली असल्यामुळे ती वैशिष्टयपुर्ण ठरते. या व्यवस्थेमुळे माणसाची वेगवेगळया सामाजिक गटात विभागणी केली जाते. त्या गटाला जाती असे म्हटले जाते.

भारतात नागरी, संस्कृतिक, धार्मिक, राजकीय, इ. कर्तव्ये आणि अधिकार प्रत्येक जातीला अतिशय प्रगत मात्र विषम स्वरूपात वाटून दिलेले आहेत. ही जातीयता धार्मिक तत्वावर आधारलेली आणि पवित्र असलेली रचना आहे. अशी धर्मश्रध्दा आहे. अशा प्रकारे जातीयतेला प्राप्त झालेली हिंदू धर्माची तात्वीक बैठक आणि समर्थन यामुळे उत्तरोतर जाती व्यवस्था अधिकाधिक घट्ट होत आहे. (१ पृ.क्र. ७९-८०)

२) आर्यांने भारतात आगमन होण्यापुर्वी अदिवासी हे या देशाचे मुळ निवासी होत. या भूमीचे अधिपुत्र होते. त्यांचे विविधतेने समृध्द संस्कृती निवासी होते. या भूमीचे अधिपुत्र होते. त्यांचे विविधतेने समृध्द संस्कृती परंपरा, रूढी व रितीरिवाजांना अनुारून त्यांची जीवनपध्दती होती. स्वतःचे सामाजिक व सांस्कृती तत्वज्ञान होते. त्यांचे आदिम जीवन सामाजिक, राजकीय, संस्कृतीक व धार्मिकदृष्टया आणि पुढारलेले होते. (२ पृ.क्र २ )

३) “ दलित ” शब्दांची व्युप्तत्ती दळण-दळित-दलित अशी होय. दळले गेलेले-जात असलेले ते दलित व पासून दलित हा शब्द तयार झाला असावा तर्क केला जातो. ( ३ पृ.क्र. ४६ )

४) भारतीय संविधानाच्या ३४१ व ३४२ अनुच्छेदानुसार मागासलेले म्हणून जे वर्ग साष्ट्रपतीच्याद्वारे जाहिर केले जातात. त्यापैकी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या संख्येच्या व त्यांच्या समस्येच्या व्यवपकतेच्या दृष्टीने अधिक महत्वाच्या गणल्या जातात. ( ४ पृ. क्र. ९)

५) अनुसूचित जाती - जमाती मिळून भारताची एक तृतीयांश लोकसंख्या होते. हे दोन्ही गट भारतीय समाजातील सर्वाधिक वंचित घटक म्हणून ओळखले जातात. जातिभेद आणि वंशभेदावर आधारित असलेल्या आणि पुरातन काळापासून चालत आलेल्या आर्थिक वंचना, सामाजिक क्षेत्रातील भेदभावाची वागणूक आणि अस्पृश्यता त्यांच्याच चाटयाला आली आहे. ( १ पृ. क्र. ९ )

६) ब्रिटीश राजवटीत दलितांचे जीवन, संस्कृती, धर्म व त्यांचे ज्वलंत प्रश्न इ. समजून घेण्याच्या प्रकियेला सुरूवात झाली. ज्या देशात दलितांवर अन्याय, अत्याचार, जुलूम होत होता त्या ठिकाणी कमिटयामार्फत पाहणी करून शिफारशी करण्याचा प्रयत्न ब्रिटीश राजवटीत सुरू झाला. ( २ पृ. क्र ५ )

**आंबेडकरवाद -**

**Definstion & Ambedkarism -**

1) Ambedkarsim is a Movement of Liberation of Man in this life, suffering in the insulted, inhumane, irrational, unscientific] unjust and unequal social order, to establish right relationalship between Man and Man ( Gender neutral ) in an Ideal Society of Justice - Liberty - Equality - Fraternity based on the New Revolutionary Ideology of Humanism ( Manuski - Manavtawad )

2) Ambedkarism is a Philosophy of bringing a Revolutionary Change in the Caste-Class-Race-Gender System by the Ideology of Humanism ( Manuski- Manavtawad ) and establish a new Social Order which is Just, Equal, Equitable, Scientific, Rational and Humane, thereby liberating Man in this life.

3) Ambedkarism is a Philosophy which brings about Social and Cultural Transformation ( Total Revolution ) upholding Humane and Democratic principles of Equality-Liberty-Fraternity-Justice keeping the all round Development of Man ( Gender neutral ) as the vision and goal.
4) The Ideology to establish a Humanitarian Order by changing unequal order of Brahmanism is Ambedkarism.
5) The Ideology to create Man in a social order based on Equality-Liberty-Fraternity and Justice is Ambedkarism. In order all are ensured of equal development and equal opportunity.

**आंबेडकरवादी उद्दिष्टये :-**

आंबेडकरवादी विचाराचे अभ्यासक विजय मानकर यांनी आंबेडकरवादाचे राष्ट्रीय नियोजनात पुढीलप्रमाणे उद्दिष्टये सांगितली आहेत.
१) समाजव्यवस्थेचा पाया जातीविरहित आणि वर्गविरहित नुसार निर्माण करून समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या तत्वावर आधारित मानवी जीवन पध्दती निर्माण करणे.
२) केवळ समाजातील पुरूष - पुरूष समानता साध्य करणे नसून स्त्री - पुरूष समानता निर्माण करणे.
३) लोकशाही संविधानुसार सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या आधारे राजकीय लोकशाही तयार करणे.
४) संविधानाचा मुख्य घटक मानव आहे.
५) लोकशाहीचा आत्मा करावयाचा संविधानात्मक कायदा म्हणजे एक मानव ! एक मूल्य !
६) आर्थिक समानता वैयक्तिक समवेत नसून मानवी समुहातील आहे.
७) ब्राम्हणवादाचे तत्वज्ञान आणि सामाजिक आदेश पुर्णपणे नायनाट करून टाकणे.

**आंबेडकरवादासंबंधीचे काही विधाने :-**

आंबेडकरवादी विचाराचे अभ्यासक विजय मानकर यांनी आंबेडकरवादराच्या राष्ट्रीय नियोजनात पुढीलप्रमाणे विधाने केली आहेत.
१) समाजातील असमान व्यवस्था बदलून मानवतावादी व्यवस्था निर्माण करणे हा आंबेडकरवादाचा मुख्य हेतू आहे.
२) आंबेडकर हा मानवमुक्तीचा विचार आहे आणि हा एक वैज्ञानिक दृष्टीकोन आहे.
३) मानवतावादाचे नाते म्हणजे आंबेडकरवाद होय.
४) मानवाच्या प्रतिष्ठेसाठी चाललेले आंदोलन म्हणजे आंबेडकरवाद होय.
५) मानवाच्या याच जन्मी कल्याणकारी विचारधारा म्हणजे आंबेडकरवाद होय.
६) सर्वांच्या मुक्तीचा - विकासाचा - मानव उत्कर्षाचा मार्ग म्हणजे आंबेडकरवाद होय.
७) माणसाला जन्म देणारी, जीवन जगण्याचा मार्ग देणारी विचारधारा म्हणजे आंबेडकरवाद होय.
८) मानसिक, सामाजिक, आर्थिक, राजकीयख संास्कृतिक परिवर्तन म्हणजे आंबेडकर होय.
९) आंबेडकरवाद हा एक विचार किंवा आंदोलन आहे की जे शोषण व अन्यायाच्या विरोधात आहे आणि त्याच्या जागी मानवतावादी वैकल्पिक व्यवस्था आहे. ही पूर्णपणे वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित आहे.
१०) ब्रामहणवादाचे बीजनाश करणारी विचारधारा म्हणजे आंबेडकरवाद होय.
११) आंबेडकरवाद हे केवळ विचारांचे दर्शन नाही तर सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतीक जीवनात बदल आणणारे संपुर्ण आंदोलन होय.
१२) आंबेडकरवाद ही एक अशी विचारधारा आहे की जी मानवाला मानवतावादाकडे घेवून जाते ज्यामध्ये गुलामाला गुलामीतून मुक्त करून मानवतावाद स्थापन करते.
१३) समता-स्वातंत्र्य-बंधुत्व-न्याय या तत्वावर परिपूर्ण मानवजात निर्माण करणारी समाजव्यवस्था होय. या समाजव्यवस्थेत सर्वांचा सर्वांगीण विकास आणि सर्वांना समान संधी मिळते.

Ambedkarism is a new revolutionary ideology of humanism. Ideology is the product of struggle. The struggle of 108 years of Mahatma Jotiba Phule, Rajshri Shahu Maharaj, Narayan Guru & Dr. Babasaheb Ambedkar. This struggle achieved a “ Historical Success ” during the period of Dr. B.R. Ambedkar. ( 5 drafted P.N. 1 to 4 )

**आदिवासीच्या प्रगतीसाठी शासनाने केलेले कायदे :-**

दलितांच्या प्रगती करण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोनातून अध्ययन करण्यास सुरूवात झालेली आहे. अनुसूचित जाती - जमाती मिळून भारताची एक चर्तुथांश लोकसंख्या होते. हे दोन्ही गट भारतीय समाजातील सर्वाधिक वंचित घटक म्हणून ओळखले जातात. जातीभेद आणि वंशभेदावर आधारित असलेल्या आणि पुरातन काळापासून चालत आलेल्या आर्थिक वंचना, सामाजिक क्षेत्रातील भेदभावाची वागणूक आणि अस्पृश्यता त्यांच्याच वाटयाला आली आहे.

अनुसूचित जाती ही संज्ञा प्रथम सायमन कमिशनने वापरली. भारतीय १९३५ च्या कायद्याच्या परिशिष्टात अशा अनुसूचित जातीची पहिली अधिकृत यादी प्रकाशित करण्यात आली. ( ४ पृ. क्र. ९ )

भारतातील राजकीय, शैक्षणिक, सार्वजनिक सेवा इत्यादी क्षेत्रातील आरक्षण आणि दलितांना नागरी आणि सांस्कृतिक अधिकारांच्याविषयी संरक्षण देण्याचे धोरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी १९३० सालीच आखले होते. त्यामुळेच स्वातंत्र्यापुर्वीच्या १९३५ च्या कायदयात अशा वैधानिक स्वरूपात त्याचे रूपांतर झाले. ( १ पृ. क्र. ११३ )

भारतीय संविधानाचे कलम १७ अन्वये “ अस्पृश्यता ” नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोत्याही स्वरूपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. “ अस्पृश्यतेतून उदभवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे ” हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहे. ( ६ पृ. क्र. १० )

भारतीय स्वातंत्र्यता काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेद्वारे खास दलितांसाठी सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या. सेविधानाच्या ४६ व्या अनुच्छेदानुसार समाजातील दुर्बल गटाचे विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधाचे रक्षण शासन काळजीने करेल आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून त्यांचे रक्षण करील. असे आश्वासन दिले आहे. सेविधानाच्य १६४, २७५, ३३०, ३३२, ३३४, ३३५, ३३८, ३३९ या अनुच्छेदानुसार अनुसूचित जाती-जमातीचे हक्क विचारात घेतले आहेत. ( ४ पृ. क्र. ९ - १० )

भारतीय दलितासाठी १९५० साली सामाजिक भेदभाव आणि सामान्य बहिष्काराच्या विरोधात कायदेशीर तरतूद केली आणि त्यांना आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात अधिकाधिक सहभाग होता यावे यासाठी धोरण आखून सामाजिक क्षेत्रामध्ये विषमतेच्या विरोधातील दोन कायदे करण्यात आले. अस्पृश्यता विरोधी कायदा, ॲक्ट ऑफ १९५५ ( १९७९ साली या कायदयाचे Civil Right Protection Act मध्ये रूपांतर झाले ) आणि Prevention of Actrocities Against Schudule Caste Act 1989 असे करण्यात आले. या अधिनियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी ३० जानेवारी १९९० पासून करण्यात आली. आर्थिक क्षेत्रातील भेदभाव विरोधी खास असे कायदे करण्यात आलेले नाही. परंतु दलिताचे आर्थिक क्षेत्रातील भेदभावापासून संरक्षण करण्यासाठी शासनाने Reservation Policy नावाचे आरक्षण धोरण राबवून सरकारी नोक-या शिक्षण संस्था व इतर सार्वजनिक क्षेत्रात वाटा मिळण्याचे संरक्षण दिले आहे. १९७० ला Special Component Plan for the Schedule Caste ( अनुसूचित जातीसाठी विशेष उपयोजना ) याद्वारे दलितांना रोजगार, भांडवल, शिक्षण आणि घरदार वगैरे क्षेत्रात अधिकाधिक संधीचा लाभ मिळून दलितांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी उपक्रम राबविण्याची व्यवस्था केली आहे.

भारतीय जातीनिहाय समाजव्यवस्थेतील मूलभूततत्वे आणि नितीकल्पना या समानतेच्या संकल्पने विरोधी आहे.

Civil Right Protection Act 1955 ( नागरी हक्काचा संरक्षण कायदा ) आणि Prevention of Atrocities Act 1989 ( अत्याचार विरोधी कायदा ) होऊनही अनुसूचित जाती व जमातीवर मोठया स्वारूपात अत्याचाराच्या नोंदी सरकारी दरबारी आढळतात. ( SC/St Report )

| सन Year | खून Murder | गंभीर दुखापत करणे Grievous Hunt | बलात्कार Rape | जाळपोळ घटना Arson | इतर Other Crime |
|---|---|---|---|---|---|
| १९८१-२००० | ८११५ | ३२,६५८ | १२,१६८ | ९८८१ | १,९४,२६५ |

भारतातील सर्व दलित समाज दारिद्रय, अनारोग्य, कर्जबाजारीपणा, शोषण, अज्ञान, अशिक्षितपणा,अनिष्टरूढी, परंपरा, इत्यादी समस्या दिसतात. पारंपारिक शेती पध्दत, शिक्षणाचा अभाव, अज्ञान, बेरोजगारी, शासनाचे जमीनमालकी व वनविषयक धोरण, अंधश्रध्दा, आत्मसंतुष्ट प्रवृत्ति, शासकीय व राजकीय उदासीनता व आर्थिक दारिद्रय दिसते.

**सामाजिक न्यायासाठीचा दृष्टिकोन :-**

भारतीय धर्मनिरपेक्ष घटनेवर आधारलेले गणराज्य स्थापन होऊन आज ६७ वर्षे झाली तरी नागरीहक्काचा कायदा अंमलात येऊनही अस्पृशता आणि विषमता मोठया प्रमाणात आढळते. कायद्याने अस्पृशंाना मानवतेचा अधिकार किंवा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात समान हक्क वापरण्याचा प्रयत्न केला तर वरिष्ठ जातीतील लोकांनी शारीरिक अत्याचार किंवा हिंसेचा वापर केलेला दिसतो. यालाच हिंदु धर्मातील लोक धार्मिक, तसत्विक आणि सामाजिक पावित्र्याचे समर्थन करतात. भारतीय विषमतेवर गौतम

बुध्द, रामानुजाचार्य, कबीर, चक्रधर स्वामी, चारकरी संप्रदाय, महात्मा फुले, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि.रा. शिंदे डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादीनी प्रयत्न केलेले आहेत. दलित चळवळीतील बांधीलकी बंध्द, कबीर, मार्क्स, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी आहे. तशीच ती स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या चतु:सूत्रीशीही आहे. ( ३ पृ. क्र. ५० )

ब्रिटीश राजवटीत दलितांचे जीवन, संस्कृती, धर्म व त्यांचे ज्वलंत प्रश्न इ. समजून घेण्याचा प्रक्रियेला सुरूवात झाली. या प्रदेशात दलितांवर अन्याय, अत्याचार, जूलूम होत होता. त्याठिकाणी कमिटयामार्फत पाहणी करून शिफारशी करण्याचा प्रयत्न ब्रिटीश राजवटीत सुरू झाला. ( २ पृ. क्र. ५ )

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते हिंदु समाज व्यवस्था नागरी, सांस्कृतीक, धार्मिक, राजकीय क्षेत्रातील नातेसंबंधातील विषमता मान्य करते. म्हणून त्यांनी अस्पृशता निर्मुलनाचे काम १९२० पासूनच सुरू केले होते.हिंदु समाजाची पूर्णमांडणी करण्यासाठी त्यांनी बुध्दीझमचा पुरस्कार केला. हिंदु समाजात दृढ असलेली जातीयता, ब्राह्मणवाद तसेच हिंदुधर्मातील कर्मकांड, दैववाद, अंधश्रध्दा आणि अज्ञान इत्यादी गोष्टीमुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विषमतेला खतपाणी घातले जाते. तसेच कर्मवाद आणि पुर्नजन्म वगैरे हिंदु तत्वज्ञानातील वैज्ञानिक विचारसरणीच्या सामाजिक आशयाचा स्वीकार केला आहे. कारण ते तत्वज्ञान भारतीय सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय आणि आर्थिक पुर्नरचना करण्यासाठी उपयोगी पडेल आणि त्यामधूनच समाजाला समानता, न्याय आणि बंधुभाव वाढीला लागेल. दलित समाजाचा प्रश्न वेगळा असून अस्पृश्यता व बहिस्कार त्यांना सहन करावा लागतो. आणि त्या नागरिकत्वाच्या संास्कृतिक, धार्मिक, राजकीय अशा सर्व प्रकारच्या अधिकारापासून वंचित रहावे लागते.

## निष्कर्ष :-

१) भारतीय समाजाने राज्यघटनेप्रमाणे आणि इतर कायद्यात दाखवून दिलेल्या तात्विक चौकटीप्रमाणे सर्वमान्य अधिकाराचा वापर करून त्याची अंमलबजावणी करावी. यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, आणि राजकीय विषमतेवर उपाय शोधले पाहिजेत.

२) भारतीय सामाजिक संबंधाची आणि व्यवहाराची जातीव्यवस्थेपासून हरकत घेवून समानता, न्याय, बंधुंभाव या मूल्यांवर आधारित पुर्नबांधणी आवश्यक आहे. त्यासाठी हिंदुच्या विषमता, अन्याय, तिरस्कार इत्यदीचा पुरस्कार करणा-या धार्मिक आणि सामाजिक व्यवस्थेच्या विरोधात सामाजिक चळवळ उभी करण्याची गरज आहे.

३) भारतीय कायद्याने समाजात परिवर्तनाऐवजी सवर्णाची मानसिकता बदलून अस्पृश्यतेबद्दल आंतरिक भावना रूजविली पाहिजे.

४) भारतीय कायद्याने अनुसूचित जाती-जमातींना कायदेशीर हक्क मिळाले पण प्रत्यक्ष या कायद्याचा लाभ अल्पप्रमाणात मिळाल्याचे दिसते.

५) भारतीय कायद्यांची तात्वीक चौकटीपेक्षा भारतीय समाजाची सामाजिक, सांस्कृतीक,, आर्थिक व धार्मिक चौकट बळकट असल्याने त्यात अस्पृश्यांना समाविष्ट करून समानता, न्याय, बंधुता यांची प्रचिती आणली पाहिजे.

६) भारतीय समाजात आजही हिंदु पारंपारिक कायदेकानुने आणि रितीरिवाजरामुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय इ. सर्व क्षेत्रात बंधने घातली जातात.

७) मानवी हक्क संकल्पनेत मानवी समाजात समाजकरणाच्या केंद्रस्थानी व्यक्ती असते. परंतू हिंदु धर्मातील जातीव्यवस्था ही वस्तुस्थिती मान्य करीत नाहीत.

८) भारतीय आरक्षित जातींना जातीयतेमुळे व अस्पृश्यतेमुळे भेदभाव आणि बहिस्कार यांचा अधिक दुष्परिणाम भोगावे लागते. मागासवर्गीय जातीच्यावर झालेल्या सामाजिक व आर्थिक बहिस्काराचे मोजमाप मानवी विकासाची कोणतेही मोजपट्टी लावली तरी अधिक भीषण असल्याचे जाणवते.

## संदर्भ ग्रंथसुची :-

१) डॉ. सुखदेव थेरात; दलित निरंतर विषमता आणि दारिद्रय सुगावा, प्रकाशन, पुणे - २००७
२) डॉ. विनायक तुगराम ; आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा विजय प्रकाशन, नागपूर- १९९४
३) डॉ. अविनाश सांगोलेकर; दलित साहित्य- प्रवाह आणि प्रकार प्रतिमा प्रकाशन, पुणे- २००८
४) लक्ष्मणशास्त्री शास्त्री, संपादक मराठी विश्वकोश, महाराष्ट्र रा.स.म. मुंबई- १
५) Vijaykumar Natural plan to succeed in Ambedkarism ( drafted )
६) महाराष्ट्र शासन हस्तपुस्तिका, अनुसूचित जाती-जमाती ( अत्याचार प्रतिबंध ) महाराष्ट्र शासन मुंबई
७) Annual Report of Commission for the SC & ST New Delhi.